**महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळामार्फत**
**उदयोग उभारण्यासाठी, उत्पादन सुरू**
**करण्यासाठी, तसेच खाणप्रकल्पांना**
**देण्यात येणाऱ्या संमतीपत्रासाठी**
**आकारण्यात येणाऱ्या संमतीशुल्काच्या**
**दरात सुधारणा करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**पर्यावरण विभाग**
शासन निर्णय क्रमांक - मप्रनि२०११/प्रक्र२६/तांक-२,
**१५वा मजला, नवीन प्रशासन भवन,**
**मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**
**दिनांक - २५/८/२०११**

वाचा:-१)शासननिर्णय,पर्यावरण विभाग, क्रमांक-इएनव्ही१०८८/६७२/प्रक्र१८५/का-१,दिनांक १८मार्च,१९९२,
२) शासन निर्णय, पर्यावरण विभाग, क्रमांक-इएनव्ही२०००/प्रक्र८८/२०००/का-१,दिनांक ८जून,२००४,
३)महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे पत्र क्र.बोओ/आरओ(पी एन्ड पी)टीबी/एम-१४७, दिनांक- ३एप्रिल,२०१०.

**प्रस्तावना :**

जल(प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण ) अधिनियम, १९७४ व हवा(प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण)अधिनियम, १९८१ मधील तरतुदीनुसार राज्यात उद्योग स्थापित करण्यासाठी वा उत्पादन सुरू करण्यासाठी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून देण्यात येणाऱ्या संमतीपत्रासाठी आकारण्यात येणाऱ्या संमती शुल्काचे दर संदर्भाधीन दिनांक १८/३/१९९२ व ८/६/२००४ च्या शासन निर्णयाद्वारे निश्चित करण्यात आले आहेत.

राज्य शासनाच्या उद्योगांबाबतच्या प्रोत्साहनात्मक धोरणांमुळे मोठया प्रमाणात उदयोगांची राज्यात वाढ झाली आहे वा होत आहे. राज्यात विविध प्रकारचे नवीन प्रकल्प

प्रस्थापित होत असले तरी , त्यामुळे होणारे जल, हवा व ध्वनी प्रदूषण सातत्याने नियंत्रणात ठेवणे क्रमप्राप्त असल्यामुळे, या उद्योगांची नियमितपणे सर्वंकष तपासणी करणे अनिवार्य असते. यासाठी मनुष्यबळ, विकसीत तंत्रज्ञान,अत्याधुनिक उपकरणे यावर खर्च करावा लागतो. सदरचा खर्च भागविण्यासाठी संदर्भ क्रमांक १ व २ येथील शासन निर्णयाद्वारे जे शुल्क पूर्वी आकारण्यात येत होते, ते अल्प स्वरूपाचे असल्याने त्यामध्ये काही प्रमाणात वाढ करून सुधारित शुल्क आकारण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रणामंडळामार्फत खाणकाम प्रकल्पासाठी आकारण्यात येणारे संमतीशुल्क हे जमीन, इमारत,प्लँट व यंत्रसामग्री इत्यादीमधील गुंतवणूकीवर आकारण्यात येत होते. मात्र, प्रत्यक्षात खाण प्रकल्पांमुळे पर्यावरणाची मोठया प्रमाणात हानी होत असते. परिणामत: खाण प्रकल्पांसाठी आकारण्यात येणाऱ्या संमतीशुल्कामध्ये वाढ करण्याची बाब देखील शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय</u> :-**

राज्यात उदयोग स्थापित करण्यासाठी वा सुरू करण्यासाठी संमतीपत्र देण्याकरिता महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून अकारण्यात यावयाच्या संमतीशुल्काचे दर खालीलप्रमाणे सुधारित करण्यात येत आहेत:-

**<u>अ) उदयोगांसाठी :-</u>**

| अ. क्र. | उद्योगाची गुंतवणूक | उद्योग स्थापन करण्यासाठी (Consent to Establish) | उद्योग (उत्पादन) सुरू करण्यासाठी (Consent to Operate) |
|---|---|---|---|
| १ | ज्या उदयोगाची गुंतवणूक रू.१०० कोटी पेक्षा जास्त आहे | भांडवली गुंतवणूकीच्या ०.०२% | भांडवली गुंतवणूकीच्या ०.०२% |
| २ | ज्या उदयोगाची गुंतवणूक रू.७५ते १०० कोटी पर्यंत आहे. | १,२५,०००/- | १,२५,०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | |
| ३ | ज्या उदयोगाची गुंतवणूक रू.५० ते ७५ कोटी पर्यंत आहे. | १,००,०००/- | १,००,०००/- |
| ४ | ज्या उदयोगाची गुंतवणूक रू.२५ ते ५० कोटी पर्यंत आहे. | ७५,०००/- | ७५,०००/- |
| ५ | ज्या उदयोगाची गुंतवणूक रू.१० ते २५ कोटी पर्यंत आहे. | ५०,०००/- | ५०,०००/- |
| ६ | ज्या उदयोगाची गुंतवणूक रू.५ ते १० कोटी पर्यंत आहे. | २५,०००/- | २५,०००/- |
| ७ | ज्या उदयोगाची गुंतवणूक रू.१ ते ५ कोटी पर्यंत आहे. | १५,०००/- | १५,०००/- |
| ८ | ज्या उदयोगाची गुंतवणूक रू.६० लाख ते १ कोटी पर्यंत आहे. | ५,०००/- | ५,०००/- |
| ९ | ज्या उदयोगाची गुंतवणूक रू.१० लाख ते६० लाख पर्यंत आहे. | १,५००/- | १,५००/- |
| १० | ज्या उदयोगाची गुंतवणूक रू.१० लाखांपेक्षा कमी आहे. | ५००/- | ५००/- |

**ब) स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी (जल अधिनियमान्वये):-**

| | | |
|---|---|---|
| १ | महानगर पालिका | रुपये १,००,०००/- |
| २ | अ वर्ग नगर परिषद | रुपये ५०,०००/- |
| ३ | ब वर्ग नगर परिषद | रुपये ५,०००/- |
| ४ | क वर्ग नगर परिषद | रुपये २,०००/- |

२ राज्यातील खाणप्रकल्पांना संमतीपत्र देताना प्रकल्प प्रवर्तकाने खाण प्रकल्पासाठी केलेल्या भांडवली गुंतवणुकीवर आकारण्यात येणाऱ्या संमतीशुल्काव्यतिरिक्त प्रति वर्षी प्रती टन रु.०.४० एवढे संमतीशुल्क आकारण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

३. वरील प्रमाणे सुधारित केलेले संमतीशुल्काचे दर या आदेशाच्या दिनांकापासून लागू होतील.

४.	हे आदेश शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०११०८२५१७०५४९००१ असा आहे.

महाराष्ट्राचे  राज्यपाल यांच्या आदेशानुसार  व नावाने,

(र.ल. लखोटे)
कार्यासन अधिकारी,

प्रति,

मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडळ, मुंबई.

सदस्य सचिव,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई,

विकास आयुक्त (उदयोग), उदयोग संचालनालय, मुंबई.

सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

विभागीय आयुक्त, कोकण/पुणे/नाशिक/औरंगाबाद/नागपूर/अमरावती.

सर्व जिल्हाधिकारी,

सर्व प्रादेशिक अधिकारी/उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदू षण नियंत्रण मंडळ,

व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनी मर्यादित, मुंबई.

सर्व कार्यासने, पर्यावरण विभाग, मंत्रालय,मुंबई-३२

निवडनस्ती (तां.क.२)